| MHMM160005161998 | खटला क्रमांक २७०/पी.डब्ल्यु./१९९८ निशाणी क्रमांक क्र. १ वरील आदेश<br>Pantnagar Police Station, Mumbai Vs. Aslam Jabir Khan |
|---|---|

**१.** सदर प्रकरणामधील आरोपीविरुध्द पंतनगर पोलीस स्टेशन येथे प्रथम खबर क्रमांक २३१/१९९६ दि. २६.०७.१९९६ नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करुन तपास पुर्ण करुन दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. सदर प्रकरणातील आरोपी हा फरार असून त्याच्या विरुध्द फरार बद्दल उद्घोषणा प्रकाशित करण्याचा आदेश पारीत झालेला आहे. परंतु, तरीही आरोपी हजर झालेला नाही.

**२.** सदर प्रकरणात आरोपी फरार असल्याने व त्याप्रमाणे जाहिरनामा बजावणीचा अहवाल दाखल असल्याने व सुप्त प्रकरण - डीएफ- असल्याने माझगाव येथील न्यायालयातील केंद्रीय अभिलेख विभागात पाठविण्यात आलेले होते व सदर प्रकरण सीआयएस मधुन निकाली दाखवण्यात आलेले होते. परंतु, निशाणी १ वरील दिनांक ०४.०४.२०२६ रोजीच्या आदेशानुसार माननीय मुख्य न्यायदंडाधिकारी, एस्प्लनेड, मुंबई यांच्याकडील पत्र क्रमांक ५२१/२०२६ दिनांक १६.०३.२०२६ इमेल आवक रजिस्टर क्रमांक १८७/२०२६ दिनांक १७.०३.२०२६ रोजीच्या परवानगीनुसार सदर प्रकरण पुन्हा फैलावर घेण्यात आले व आरोपीस पुन्हा अटक वॉरंट काढण्याचा आदेश पारित करण्यात आला. त्यानंतर निशाणी २ वर आरोपीच्या वॉरंटची न बजावणीचा अहवाल दाखल करण्यात आला व आरोपीची माहिती उपलब्ध नसुन तो फरार असल्याचा अहवाल दाखल करण्यात आला. त्यानंतर निशाणी १ वर दिनांक १२.०५.२०२६ रोजी फरार आरोपीविरुध्द जाहिरनामा बजावणी करणेबाबत वॉरंट काढण्यात आले. त्यानुसार सदर जाहिरनामा बजावणी अहवाल निशाणी ३ प्रमाणे दाखल करण्यात आला. परंतु, आरोपी जाहिरनाम्यानुसार हजर झाला नाही. सदर प्रकरण २८ वर्ष जुने असल्याने सरकारी वकील श्री. विक्रम राठोड यांना सदर प्रकरणातील वस्तुस्थिती व परिस्थिती व दोषारोपपत्रातील कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता सदर आरोपीस विनादोषारोप सोडुन देता येईल काय याबाबत विचारणा केली असता सदर प्रकरण त्या वर्गात येउ शकते असे त्यांनी कथन केले.

**३.** अश्या परिस्थितीत वस्तुस्थिती व परिस्थितीचे अवलोकन केले असता, तसेच दोषारोपपत्राचा अहवाल व त्याबरोबर पाठविलेले कागदपत्र यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सरकार पक्षाने दोषारोपपत्रामधील सादर केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा व

सरकारपक्षास त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली असता आरोपींविरुध्द केलेले उपरोक्त नमुद आरोप निराधार वाटतात व त्यामुळे दोषारोप ठेवण्यास पुरेसा पुरावा दिसून येत नाही. त्यामुळे अशा परिस्थीतीत आरोपीविरुध्द केलेले आरोप निराधार वाटतात. तसेच प्रस्तुतचे प्रकरण सन १९९८ वर्षी दाखल करण्यात आलेले असून त्यास २८ वर्ष इतका कालावधी झालेला आहे व तेव्हापासून आजपर्यंत सरकार पक्षाने आरोपीची उपस्थिती व साक्षीदारांची उपस्थिती ठेवून प्रकरण गुणदोषावर चालविण्याबाबत तसदी घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अश्या परिस्थीत उपरोक्त नमुद दोषारोपत्राचा अहवाल व त्या सोबतचे कागदपत्रांचे अवलोकन केले असता सदर आरोपीस विनादोषारोप सोडणे योग्य व न्यायिक होईल असे दिसून येते.

**४.** तसेच मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी पत्र क्र. SCMS/८३/२०२४, दि. १०.०५.२०२४ व मा. मुख्य महानगर दंडाधिकारी, एस्प्लनेड, मुंबई यांनी जावक क्र. २७६४/२०२४, दि. २२.०५.२०२४ रोजी Action Plan for reduction of arrears of old pendency नुसार जुनी व दहा, वीस व तीस वर्षे जुनी प्रकरणे निकाली काढण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच, सदर प्रकरणातील दोषारोपपत्राचे कागदपत्र अतिशय जिर्ण झालेले असुन फाटलेले आहेत.

**५.** त्यामुळे अशा परिस्थितीत वस्तुस्थिती व परिस्थितीचे अवलोकन केले असता वरील सर्व कारणांसाठी सदर आरोपीला विना दोषारोप सोडणे योग्य व न्यायिक होईल असे दिसून येते. त्यामुळे वरील सर्व कारणांसाठी मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** आरोपी अस्लम जबीर खान यास भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४५७, ३८० मधील अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २३९ नुसार विनादोषारोप सोडून देण्यात येते.

**२.** आरोपीचे जमानती बंधपत्र व जामीनकदबा रद्द करण्यात येते.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

JAVED RAJJAK MULANI

Digitally signed by JAVED RAJJAK MULANI
Date: 2026.07.16 17:47:10 +0530

**( जे. आर. मुलाणी )**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
५० वे न्यायालय, विक्रोळी, मुंबई.

**ठिकाण : विक्रोळी, मुंबई.**
**दिनांक : १६.०७.२०२६**